27924-31

जा.क्र.उमा१/कोवि/विअसंचमान्यता/१७-१८
शिक्षण उपसंचालक कार्यालय, कोल्हापूर
विभाग, कोल्हापूर दिनांक- 24 NOV 2017

प्रति,

प्राचार्य/ मुख्याध्यापक,

**सर्व मान्यताप्राप्त कायम विनाअनुदानित, विनानुदानित व स्वंयअर्थसहाय्यित तुकडया असलेल्या उच्च माध्यमिक शाळा /क. महाविद्यालये, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर**

विषय – सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाकरीता उच्च माध्यमिक शाळांच्या संच मान्यताबाबत **कायम विनाअनुदानित, विनानुदानित व स्वंयअर्थसहाय्यित तुकडया असलेल्या उच्च माध्यमिक शाळा /क. महाविद्यालये**

संदर्भ- १) मा. शिक्षण संचालक (माध्य व उच्च माध्य) पुणे यांच्या दिनांक १३/१०/२०१७ च्या सहविचार सभेतील सूचनेनूसार.

सन २०१७-१८ ची उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविदयालयांची संच मान्यता करणेबाबतच्या सूचना संदर्भ क्र. १ नुसार देणेत आलेल्या आहेत.

या विभागातील सन २०१७-१८ च्या कायम विनाअनुदानित, अनुदानित व स्वयंअर्थसहित उच्च माध्यमिक शाळा/ क.म.वि. च्या संच मान्यता सन २०१३-१४ , २०१५-१६ व २०१६-१७ च्या ऑनलाईन पध्दतीप्रमाणे (प्रबोध संगणक,पुणे) करणेत येणार आहे. यानुसार ऑनलाईन संच मान्यता करणेसाठी खाली दिलेल्या संकेतस्थळावर आपल्या कनिष्ठ महाविदयालयाची /उच्च माध्यमिक शाळेची माहिती भरणेत यावी. सदर माहिती भरताना खालील सर्वसाधारण सूचना विचारात घ्यावात.

संकेतस्थळ- www.dydekop.org

युजर आयडी- शाळेचा युडाएस पासवर्ड-

१) सदरचे संकेत स्थळावर सर्व संबंधित शाळांनी आपली माहिती शाळेच्या का.वि.अ.,वि.अ.,अथवा स्वयंअर्थसहाय्यित प्रकाराप्रमाणे परिपूर्ण भरुन घ्यावी.

२) सदरची माहिती भरताना सन २०१३-१४ , २०१५-१६ व २०१६-१७च्या संच मान्यतेनुसार विषयनिहाय पदे यांची अचूक माहिती भरावी.

३) सन २०१६-१७ च्या संच मान्यतेमध्ये कार्यभारानुसार येणारी पूर्णवेळ व अर्धवेळ पदे ही सन २०१३-१४ , २०१५-१६ व २०१६-१७ च्या संच मान्यतेमधील पूर्णवेळ व अर्धवेळ पदाशी तुलनात्मक पडताळून कमी/जादा होत असलेस त्याची खातरजमा करावी.

४) शासन निर्णय दि.२३ जून २०१७नुसार पवित्र प्रणालीमार्फत शिक्षक नियुक्त्या करण्याच्या असल्याने नाहरकत प्रमाणपत्राशिवाय केलेल्या सर्व नियुक्त्या अमान्य समजण्यात येतील. त्यामुळे जून २०१७पासून केलेल्या नवीन नियुक्त्याबाबत संचमान्यतेमध्ये सदरची जबाबदारी संस्थेची असलेबाबत शेरा नमुद करावा .

५) सन २०१७-१८ मध्ये एखादा अतिरिक्त विषय सुरु केला असल्यास त्याच्या पूर्वपरवानगीसाठी प्रस्ताव या कार्यालयामार्फत शिक्षण संचालनालयास सादर करावयाचा आहे. विनापरवानगी विषय सुरु केला जावू नये. अन्यथा विदयार्थ्यांच्या होणा-या नुकसानीस संबंधित मुख्याध्यापक व्यक्तीश: जबाबदार राहतील.

६) माहिती भरताना चुकीची माहिती भरली जाणार नाही, योग्य व परिपूर्ण माहिती भरली जाईल याची याची दक्षता घ्यावी.

७) विषयनिहाय व तुकडीनिहाय पटसंख्या भरताना या कार्यालयाचे दि. ऑगस्ट २००९ नुसार सन २००९-१० चे संच मान्यतेसंदर्भात देणेत आलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचून त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

**सन २०१७-१८ च्या संच मान्यता फाईलमध्ये खालीलप्रमाणे कागदपत्र सादर करावीत.**

८) शाळा /कनिष्ठ महाविदयालयाचा युडाएस - स्कूल रिपोर्ट कार्ड २०१७-१८.

९) सन २०१३-१४, २०१४-१५ , २०१५-१६ व २०१६-१७ च्या या कार्यालयाने मान्य करुन दिलेल्या व त्यावर स्वाक्षरी असणा-या ऑनलाईन/ऑफलाईन संच मान्यता प्रती, व वैयक्तिक मान्यताप्रती

१०) दि. ३०/९/२०१७ च्या पटसंख्येचा मुख्याध्यापक/प्राचार्य यांचा अहवाल- सोबत नमुना जोडला आहे.

११) सरल डाटाबेस वरील सन २०१७-१८ विदयार्थी रिपोर्ट ( डिव्हीजनवाईज, स्ट्रिम वाईज, स्टँडर्ड वाईज – ३ प्रकारचे) प्रस्तावासोबत सादर करावेत. Student database - student portal – report - HM level- student report यामध्ये सदरचे रिपोर्ट मिळू शकतील.

१२) शाळा /तुकडी मान्यता प्रकार, माध्यम, शाखानिहाय मुले व मुलींची संख्या- सादर करावी.

१३) संच मान्यतेमध्ये भरणेत आलेला विषयनिहाय कार्यभार, पट इ. माहिती शालेय दप्तरावरुन खात्री करुन भरणेत आलेली आहे. तसेच अ,ब, क तक्त्यात संबंधित शिक्षकांचे नावे दर्शविलेला कार्यभार हा त्या शिक्षकांनीच घेतला आहे. यामध्ये तफावत आढळल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी माझी राहील असे मुख्याध्यापक/प्राचार्य यांचे हमीपत्र सादर करावे.

१४) सन २०१७-१८ साठीचा विषय,तुकडी व पटसंख्या यानुसारचा सर्व शाळेचा एकत्रित कार्यभार तक्ता

१५) सन २०१३-१४ च्या संच मान्यतेनुसार मंजूर वर्ग/तुकडया/शाखा तसेच त्यानंतर या कार्यालयाकडून मंजूरी देणेत आलेल्या वर्ग/तुकडया/शाखा यांच्या प्रथम मान्यता आदेशाच्या प्रती – (विनाअनुदानित/स्वंयअर्थसहा.शाळा)वरील कागदपत्रे मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी साक्षांकीत करावीत.

वरील प्रमाणे माहिती तसेच अन्य आवश्यक ती माहिती, सन २०१७-१८ च्या ऑनलाईन भरलेल्या माहितीची प्रत तसेच वर नमूद कागदपत्रे यांची फाईल तयार करुन खालील दिनांकास संच मान्यता शिबीरास संबंधित लिपिक व उपप्राचार्य यांनी उपस्थित रहावे.

वरीलप्रमाणे ऑनलाईन मध्ये माहिती भरुन संचमान्यता करुन घेणे अनिवार्य आहे. ऑनलाईन माहिती वेळेत न भरल्याने संबंधित शाळेचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित प्राचार्य/मुख्याध्यापक यांची राहील.

**शिबिराचे वेळापत्रक ठिकाण खालीलप्रमाणे आहे**

| अ.क्र | जिल्हा | दिनांक | शिबीर स्थळ |
|---|---|---|---|
| १ | सिंधुदुर्ग | ४.१२.२०१७ | शिक्षण उपसंचालक कार्यालय कोल्हापूर |
| २ | रत्नागिरी | ५.१२.२०१७ | |
| ३ | सातारा | ६.१२.२०१७ | |
| ४ | सांगली | ७.१२.२०१७ | |
| ५ | कोल्हापूर | ८.१२.२०१७ | |

(एम.के.गोंधळी)
शिक्षण उपसंचालक,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

प्रत- माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी-

शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, कोल्हापूर/सांगली/सातारा/रत्नागिरी/सिंधुदुर्ग

२/- आपणास कळविण्यात येते की,आपल्या जिल्हयाच्या संचमान्यते दिवशी आपल्या कार्यालयातील सहा.शिक्षण उपनिरीक्षक यांना संचमान्यताकामी उपस्थित रहाणेबाबत आदेशित करावे.

प्रत- माहितीस्तव सविनय सादर

मा. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे

मा. शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, म.रा. पुणे

# शिक्षण उपसंचालक कार्यालय, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

## -: उच्च माध्यमिक विभाग :-

## -सन २०१७-१८ पटपडताळणी तक्ता-

कनिष्ठ महाविद्यालयाचे नांव-

युडाएस कोड- दूरध्वनी क्र. मोबाईल क्र.

दिनांक ३०/९/२०१६ ची पटसंख्या व सरासरी उपस्थिती :-

**-अनुदानित-**

| अ. क्र. | तपशिल | इयत्ता ११ वी | | | | | इयत्ता १२ वी | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कला | वाणिज्य | संयुक्त | विज्ञान | एकूण | कला | वाणिज्य | संयुक्त | विज्ञान | एकूण |
| १ | मंजूर तुकडयांची संख्या | | | | | | | | | | |
| २ | नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थी संख्या | | | | | | | | | | |
| ३ | पुर्नप्रवेश | | | | | | | | | | |
| ४ | ए.टी.के.टी. अंतर्गत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | | | | | | | | | | |
| ५ | एकूण पटसंख्या | | | | | | | | | | |
| ६ | सरासरी उपस्थिती | | | | | | | | | | |

विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित/ स्वंय अर्थसहाय्यित शाळा (लागू नसेल ते खोडावे)

| अ.क्र. | तपशिल | इयत्ता ११ वी | | | | | इयत्ता १२ वी | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कला | वाणिज्य | संयुक्त | विज्ञान | एकूण | कला | वाणिज्य | संयुक्त | विज्ञान | एकूण |
| १ | मंजूर तुकडयांची संख्या | | | | | | | | | | |
| २ | प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | | | | | | | | | | |
| ३ | पुर्नप्रवेश | | | | | | | | | | |
| ४ | ए.टी.के.टी. अंतर्गत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | | | | | | | | | | |
| ५ | एकूण पटसंख्या | | | | | | | | | | |
| ६ | सरासरी उपस्थिती | | | | | | | | | | |

**प्रमापणपत्र**

प्रमाणित करणेत येते की, वर दिलेली मंजूर तुकडया, विदयार्थी संख्या इ. माहिती ही जनरल रजिस्टर, शाळा सोडल्याचे दाखले, विद्यार्थी हजरी पत्रके व तुकडया मंजूरी आदेश इ. शालेय रेकॉर्डवरुन दिलेली असून ती खरी व तंतोतंत बरोबर आहे याची मी खात्री केली आहे. तसेच उपरोक्त प्रमाणे माहिती सरल मध्ये भरणेत आलेली आहे.

सदरची माहिती चुकीची/खोटी आढळल्यास मी कायदेशीर कारवाईस पात्र राहीन याची मला जाणीव आहे.

सही/-

(नाव- )

प्राचार्य/मुख्याध्यापक

शिक्का